सत्यप्रभा दि. 19/05/2022

# अवैध दारू विक्रीप्रकरणी बारा जणांना प्रत्येकी २५ हजाराचा दंड

**नांदेड (प्रतिनिधी) दि.१९:** अवैधरीत्या हातभट्टीची दारु विक्री करणाऱ्या १३ गुन्ह्यातील १२ जणांना २५ हजाराचा दंड उमरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. एस. धपाटे यांनी ठोठावला आहे. यातील एकाचा दोन गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्याने त्याला ५० हजार रुपये दंड भरावा लागणार आहे.

उमरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लक्ष्मण दाराम हिवराळे, शिवाजी माधव दंतलवाड, गणेश पोमा चव्हाण, शिवराम चव्हाण, माधव चंदर सावंत, विशाल शांतवन रणवरे, दिलीप चंदर सावंत, रमेश शामराव चव्हाण, गंगाधर विश्वनाथ कटकदवणे, निलाबाई परसराम राठोड, लक्ष्मण राजाराम धनवे आणि साईनाथ बीरेवार यांच्यावर उमरी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५ (ई) आणि कलम ६५ (एफ) आदी कलमानव्ये गुन्हा दाखल होता यातील एकाचा दोन गुन्ह्यांमध्ये सहभाग आहे. तपासाअंती दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करण्यात आले हा खटला उमरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. एस. धपाटे यांच्या न्यायालयात चालला दोन्ही बाजूचा युक्तिवाद, उपलब्ध पुरावा व हातभट्टी दारु संदर्भाचा न्यायवैधक प्रयोग शाळेचा अहवाल ग्राह्य मानत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. एस. धपाटे यांनी १३ गुन्ह्यांतील आरोपींना प्रत्येकी २५ हजार रुपये असा एकूण ३ लाख २७ हजार रुपये रोख दंड ठोठावला आहे. या प्रकरणातील १२ पैकी १ आरोपी दोन गुन्ह्यांत सहभागी असल्याने त्याला ५० हजार रुपये दंड भरावा लागणार आहे. दंड न भरल्यास सहा महिने तुरूंगात राहावे लागेल असा आदेश देण्यात आला आहे. या खटल्यात सरकार पक्षाची बाजू सहाय्यक सरकारी वकील ॲड. जाधव यांनी मांडली तर पैरवी अधिकारीची भूमिका पोलीस जमादार कंधारे व सुगावे यांनी पार पडली.